ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi January - March - 2019

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖
Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ३९ | नवमार्क्सवाद<br>डॉ. पी. डी. सूर्यवंशी<br>डॉ. व्ही. जी. कदम | १७९-१८२ |
| ४० | औदुंबर एक दुर्लक्षित धार्मिक पर्यटन क्षेत्र<br>Dr. U. N. Suryawanshi<br>Dr. H. Y. Karande | १८३-१९१ |
| ४१ | उत्तर आधुनिकता वाद आणि भारतीय समाज<br>प्रा. डॉ. विलास के. मगर | १९२-१९५ |
| ४२ | भारतातील भूक वा उपासमार : एक समकालीन चर्चा !<br>प्रा. डॉ. वाघमारे हरी साधू | १९६-१९९ |
| ४३ | इयत्ता ९वी च्या विद्यार्थ्यांना नकाशा वाचनात येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाययोजना - एक अभ्यास<br>डॉ. आनंद ज्ञानेश्वर शिंदे | २००-२०५ |
| ४४ | महात्मा गांधीजींचे शिक्षणविषयक विचार : एक दृष्टीक्षेप<br>प्रा. डॉ. डिसले महादेव सदाशिव | २०६-२०९ |
| ४५ | महाराष्ट्रातील सामाजिक आणि राजकीय चळवळीतील नवीन प्रवाह<br>प्रा. डॉ. मारुती घंटेवाड | २१०-२१४ |
| ४६ | नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या राणी झांशी रेजिमेंट मधील उपेक्षित महिलांचे योगदान<br>डॉ. घोलप कमलाकर गोरख | २१५-२२० |
| ४७ | महाराष्ट्रातील काँग्रसप्रणीत आघाडीचे राजकारण<br>प्रा. मारुती चांगदेव हजारे | २२१-२२४ |
| ४८ | एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम<br>प्रा. मगर पांडुरंग किसनराव | २२५-२२९ |
| ४९ | महात्मा गांधी विचारातील सर्वोदय तत्वज्ञान<br>डॉ. बोरोळे रजनी अनंतराव | २३०-२३४ |
| ५० | भारतीय इतिहास लेखन आणि स्त्रीवाद<br>प्रा. डॉ. सुनिल रजपूत | २३५-२३७ |





Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ५०. भारतीय इतिहास लेखन आणि स्त्रीवाद

प्रा. डॉ. सुनिल रजपूत
जवाहर महाविद्यालय, अणदूर, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

**प्रस्तावना**

२० व्या शतकात विविध क्षेत्रात अनेक स्थित्यंतरे घडून आलेली आहेत. पाश्चात्यांच्या आगमनाने भारतात समाज प्रबोधनाला प्रारंभ झाला. भारतातील समाज सुधारणेच्या चळवळीचा शुभारंभ स्त्री -शुद्र दास्य विमोचनाच्या प्रेरणेने झाला. ही प्रेरणा १९ व्या शतकाच्या प्रारंभी बुध्दीवादावर आधारलेल्या इंग्रजी शिक्षणाने वैचारीक स्वातंत्र्य प्राप्त झालेल्या भारतीय सुशिक्षितांना लाभली.

ज्ञान हीच शक्ती हा महामंत्र समाजसुधारकांनी मोठया प्रमाणात निष्ठेने जपण्यास प्रारंभ केला. समाजसुधारक, लेखक, इतिहासकार यांच्या समाज क्रांतीच्या भूमिका सारख्या नव्हत्या. कुणी ज्ञान प्रसारावर भर दिला, कुणी धर्मसुधारणेची कास धरली, कुणी राजकीय जागृतीस महत्व दिले, कुणी नैतिक उन्नती हा सुधारणांचा गाभा आहे असे मानले, कुणाला स्त्रीदास्य विमोचन महत्वाचे वाटले, कुणी दलितोध्दाराला प्राधान्य, कुणी रूढीवादावर प्रहार केले. या विविध वैचारीक क्रिया - प्रतिक्रियांच्या वादळातूनच आधुनिक इतिहास लेखनाच्या चिंतनास प्रारंभ झाला.

**भारतीय इतिहास लेखनातील विचार प्रवाह**

आधुनिक काळात इतिहास लेखन पध्दतीत संशोधन होऊन वसाहतवादी, मार्क्सवादी, आंबेडकरवादी इ. विचार प्रवाह निर्माण झाले. इ.स.१९७५ नंतर रणजीत गुहा यांनी त्याकाळात उदयास आलेल्या 'सबाल्टनस्टडी ' ( वंचितांचा, दुय्यम ) या इतिहास लेखनातील नवविचार प्रवाहाने वंचितांना गृहीत धरून इतिहास लेखनाची पुर्नमांडणी करण्याचा प्रयत्न केला. परंतू या वंचितांमध्ये सबाल्टनवाद्यांनी दलित व स्त्रीवर्ग या वंचित गटाला फारसा न्याय दिलेला आढळत नाही. याच काळात स्त्रीवादी चळवळीनी जोर धरला आणि समाजकारण, अर्थकारण, राजकारण तसेच शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रिडा क्षेत्रात आपले स्थान काय आहे ? याकडे आपले लक्ष केंद्रीत केले. या विचार प्रक्रियेतूनच स्त्री वादी इतिहास हा एक नव विचार प्रवाह इतिहासामध्ये रूढ झाला.

**स्त्रीवाद म्हणजे काय ?**

" स्त्रीवाद ही पुरूषविरोधी विचारधारा नसून पुरूषी वर्चस्वाच्या व्यवस्थेविरोधी असणारी विचाराधारा आहे."

मानवी इतिहासाच्या जडणघडणीत पुरूषांपेक्षा स्त्रीयांना दुय्यम स्थान का आणि कसे आले याचे विश्लेषण , स्पष्टीकरण व ते नष्ट करण्यासाठी अवलंबण्याचे मार्ग, आव्हाने, चळवळी यांची मांडणी व अभ्यास म्हणजे स्त्रीवाद होय.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

स्त्रीवाद म्हणजे पुरूषी गुलामीतून स्त्रीची सुटका करणे म्हणजे पुरूषां विरोधात स्वातंत्र्यासाठी बंड करणे. परंतू पुरूषांपासून फारकत घेणे असा याचा अर्थ होत नाही.

या व्याख्यांवरून एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळात स्त्री ही कुटुंबासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग करते, मात्र तिला मत असत नाही. आता ती तिचे मत मांडू इच्छिते. ती तिचे वेगळे कर्तृत्व करू इच्छिते याचा अर्थ असा होत नाही की, ती कुटुंब , पती, कुटुंब व्यवस्था नाकारते. स्त्रीबद्दल स्त्रीवादी दृष्टीकोनातून हिंदू समाजात स्त्रीच्या स्थानाचा शोध आ.ह. साळुंके यांनी 'हिंदू संस्कृती आणि स्त्री' या ग्रंथात घेतलेला आहे.

**स्त्रीवादी इतिहास लेखन**

स्त्रीवादी विचार हा नेहमी अस्तित्वात होताच परंतू स्त्रीवादाचे सैध्दांतिकीकरण हे सत्तरच्या दशकाचे अपत्य आहे. स्त्रीवादी लेखन हे प्रामुख्याने मानवाचे हक्क, समाजवादी सिध्दांत, लिंगभेद दृष्टिकोनाचा अभ्यास इत्यादींशी संबंधीत आहे. स्त्रीवादी सिध्दांताचा साधारण अर्थ असा की, स्त्रियांची दुय्यमत्वाचे चिकित्सक स्पष्टीकरण देणारी ज्ञानशाखा. उदारमतवादी, जहालमतवादी, मार्क्सवादी आणि समाजवादी, उत्तर आधुनिकतावादी हे स्त्रीवादी सिध्दांताचे सर्वसामान्य वर्गीकरण केले जाते. झिलाह आईन्स्टाईन स्त्रीवादी दृष्टीकोनाचा विकास हा उदारमतवादी विचारसरणीतून झाला आहे, असे मानतात.

**पाश्चात्य आणि भारतीय स्त्रीवाद**

स्त्रीवाद ही प्रामुख्याने पाश्चात्य विचारधारा आहे. मानवी इतिहासाच्या वाटचालीत स्त्री म्हणून तिचे स्वतंत्र अस्तित्व न मानता तिच्याकडे पुरूषकेंद्रित दृष्टीकोनातून पाहिले गेले. त्यामुळे संस्कृतीच्या प्रगतीमध्ये स्त्रीला दुय्यम स्थान मिळाले. इतिहासकार लिंडा गार्डन म्हणतात. " स्त्रीयांचे दुय्यमत्व आणि त्यासाठी कराव्या इ लागणा-या संघर्षाचे विश्लेषण म्हणजेच स्त्रीवाद होय ."

भारतीय स्त्रीवादाच्या संदर्भात पाश्चात्य स्त्रीवादी विचारांचा नेमका अर्थ कसा लावला गेला पाहिजे हा प्रश्न फार महत्वाचा आहे. भारतीय समाजाचे वास्तव लक्षात घेता पूर्ण औद्योगिकरण निगडीत असणारी सामाजिक चळवळ यामध्ये मवाळ सुधारणावादी दृष्टीकोनापासून समाजात सर्वांगिण बदलापर्यंत विविध भूमिका असणा-यांचा समावेश होतो. या सर्वांमध्ये दिसणारा एक समान दृष्टीकोन म्हणजे स्वतःची जीवनपध्दती आणि व्यवसाय निवडण्यामध्ये स्त्रीयांना पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे.

**स्त्रीवादी इतिहास अभ्यास प्रवाह**

स्त्रीवर्गास इतिहास आहे तो कसा असावा, तो कशा प्रकारे मांडावा या विषयी मांडणी करून त्यावर भाष्य करून सर्वयुगात, सर्व क्षेत्रात , स्त्री कतृत्व , स्त्रीचे योगदान, स्त्रीचे शोषण , दास्य या विषयांचा अभ्यास करून याची ऐतिहासिक मांडणी करण्याचा प्रयत्न या प्रवाहान केला आहे. इ.स.१९७० नंतर स्त्री आंदोलनांनी, स्त्रीशोषणाची मिमांसा करून ती शास्त्रशुध्द दृष्टीकोनातून अभ्यासण्याचा प्रयत्न केला. सर्वसामान्य स्त्रीचा



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

अभ्यास उमा चक्रवर्तीसारख्या स्त्रीवादी अभ्यासिकेने सुरू केला. सामान्य स्त्रियांच्या अभ्यासाची दखल इतिहास लेखनाने उशिरा घेतली. इ.स.१९९० नंतर स्त्रीवादी इतिहास लेखनास महत्व प्राप्त झाले.

मुल्यमापन

संपूर्ण जगात पुरूषाने स्त्री स्वातंत्र्यावर घातलेली बंधने, स्त्रीची प्राचीन काळापासून होणारी हेळसांड रोखण्यासाठी केलेले विविध प्रकारचे प्रयत्न आणि कायद्याने समस्यांची सोडवणूक हा स्त्रीवादी संकल्पानांचा विजय आहे. पुरूषकेंद्रीत इतिहासलेखनाची परंपरा आहे, परंतू नवीन प्रवाहामधील स्त्रीवादी इतिहास लेखनाने संशोधनाचे नवीन दालन खुले केले आहे. स्त्री ही एक व्यक्ती आहे. स्वतःचे विचार, भावना व्यक्त करू शकणारे ते एक अस्तित्व आहे. जगाच्या रचनेत व तिच्यावर सोपवण्यात आलेल्या कार्यात ती सहभागी असते. तिच्यातील स्वतंत्र वैशिष्टयामुळे (पुर्नउत्पादन व संगोपन ) समाजाचा एक महत्वपूर्ण घटक म्हणून तिला स्थान दिले पाहिजे. स्त्री, हा शब्द काही सामाजिक, राजकीय व जीवशास्त्रीय तथ्यांशी निगडीत आहे. स्वलिखाणातून, अनुभवातूनच तो कसा व्यक्त होतो हे पाहणे हे स्त्रीवादी लेखनाचे उद्दिष्ट असावे.

थोडक्यात समाजात पुरूषांइतकेचे स्त्रियांना महत्वाचे स्थान आहे. म्हणूनच इतिहास हा स्त्री व पुरूष यांच्या संयुक्तिक योगदानाचा परिपाक आहे. हे स्त्रीवादी इतिहासकारांनी स्पष्ट केले आहे. परंतू आज स्त्री विरूध्द पुरूष असा सामना इतिहासजमा झाला असून स्त्रीची जागा घराच्या उंबरठयाच्या आत आहे हे मत कालबाहय झालेले असल्यामुळे स्त्री जास्तीत जास्त प्रमाणात घराबाहेरच्या उत्पादक कामात सहभागी होते. ही गोष्ट आर्थिक समृध्दी आणि सामाजिक प्रगतीसाठी उपकारक आहे. हे सर्व मान्य असल्यामुळे याबाबत इतिहासात स्त्रीवादी लिखाण होणे अत्यंत गरजेचे आहे.

संदर्भ सूची

१) पालकर के. रा. ,भारतीय स्त्री-हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पुणे, प्रास्ताविक पृ.११ प्र.आ.१९६७
२) महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास, पृ.२७६
३) पाटील पद्मजा, जाधव शोभना, भारतीय इतिहासातील स्त्रीया, फडके प्रकाशन, कोल्हापूर २००७
४) रानडे गो.मो, महाराष्ट्रातील समाजविचार, सुविचार प्रकाशन मंडळ पुणे - १९७१
५) विद्युत भागवत- स्त्री प्रश्नांची वाटचाल
६) स्त्री विकासाचे नवे क्षितिज -डॉ.स्वाती कर्वे
७) आधुनिक राजकीय विचारप्रणाली - डॉ.पी.डी.देवरे
८) आ.ह.साळुंके, हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोकवाड्.मय गृह , मंबई -१९८९



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.